# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि –४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनीयम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

अध्यापक व कर्मचारी तक्रार निवारण कक्ष

एम. आय. डी. सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली - ४४२६०५ फोन नं. ०७१३२-२१६५९६

जा.क्र.:गों.वि./अ.क.त.नि.क.५५६/२०२० दिनांक :११/१२/२०२०

## परिपत्रक

**अध्यापक व कर्मचारी तक्रार निवारण समितीकडे दाखल करण्यात येणाऱ्या तक्रारीवर नोंदणी शुल्क आकारण्याबाबत.**

विद्यापीठांचे, संलग्न व स्वायत्त महाविद्यालयांचे आणि मान्यताप्राप्त परिसंस्थांचे अध्यापक व ईतर कर्मचारी यांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ७९ अन्वये अध्यापक व कर्मचारी तक्रार निवारण समिती गठीत करण्यात आलेली आहे.

तथापी दिनांक १८ नोव्हेंबर, २०२० रोजी संपन्न झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या निर्णयानुसार, अध्यापक व कर्मचारी तक्रार निवारण समितीकडे दाखल करण्यात येणाऱ्या तक्रारीवर रूपये ५००/- नोंदणी शुल्क तसेच निकालाची प्रमाणित प्रत अर्जदार व गैरअर्जदार वगळता इतरांना उपलब्ध करुन देण्याकरीता प्रति पेज रूपये २/- प्रमाणे शुल्क आकारण्यात येईल, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

(दिपक जुनघरे)
सदस्य-सचिव, तक्रार निवारण समिती
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**प्रतिलिपी माहितीस्तव सादर:-**

१. स्विय सहाय्यक, मा. कुलगुरू कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
२. स्विय सहाय्यक, मा. प्र-कुलगुरू कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
३. सर्व विभाग प्रमुख, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
४. मा. प्राचार्य, सर्व संलग्नित व स्वायत्त महाविद्यालये गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली